६५१६

जा. क्र. /प्रा /प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 JUN 1996

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद ----------------

विषय :- सन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९५/(२२३) प्राशि-५ ---------------- दिनांक १८-१-९६ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९५ पासून इयत्ता १ ली ते सन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्त्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानतत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
| --- | --- | --- | --- |
| [illegible] शिक्षण विकास मंडळ [illegible], पुणे | प्राथमिक विद्यामंदिर [illegible] | इ. १ ली - १ तुकडी(प्रत्येकी)<br>इ. २ री —"—<br>इ. ३ री —"—<br>इ. ४ थी —"— | मराठी |

२.१ सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळो वेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

Scanned with ACE Scanner

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपांच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [ यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा. ]

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत :-

प्रशासन अधिकारी /महानगरपालिका / ~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ जिल्हा ~~पिंपरी चिंचवड~~ यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :-

मा. सचिव,
~~इंद्रायणी स्वामी शिक्षण मंडळ आळे, पुणे~~
------------------------------------ यांना माहितीसाठी अग्रेषित.

शिदे/२६४९५.

सही उत्तर- बरोबर
मानद सचिव
[illegible] स्वामी शिक्षण विकास मंडळ
आळे, ता. जुन्नर, जि. पुणे

७६८

क्र. शिक्षण/खाप्राशा/३/का वि/[struck]/०१
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.
दिनांक - [struck] २५/९/२००१

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

प्रगति विद्यामंदिर
भोसरी

विषय :- खाजगी अनुदानित /विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळांना सन २०००-२००१ या वर्षी इ. १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त तुकडया/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :-१. प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्र. खाप्राशा/२०००/तु. मा/६०७३२/ड-५१२ दिनांक- ९ ऑगष्ट २००१.
२. मा. शिक्षण उपसंचालक पुणे याचेकडील पत्र क्र. प्रा. प्राशि खाप्राशा/तुमा/पुवि/२००१ दि. १८. ८. २००१.

उपरोक्त संदर्भिय क्र. १ व २ नुसार २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात अतिरिक्त तुकडया/वर्ग मंजूर करण्याच्या दृष्टीने जे प्रस्ताव मागविण्यात आले होते. सदर प्रस्ताव या कार्यालयाच्या शिफारशीसह मा. संचालनालयामार्फत शासनास सादर करण्यात आलेले होते. या प्रस्तावाना अनुसरुन शासनाने परिपत्रक क्र. व्हीएलएस १०००[७४३/२०००]/प्राशि-३ दि. ११. ७. २००१ मधील विहित अटींना अधीन राहून सदर वर्ग/तुकडयांना मंजूरी दिलेली आहे.

या वर्ग तुकडया मंजूरी मुळे खाली नमूद केलेल्या बाबी प्रामुख्याने अवलोकन घ्याव्यात.

१] ज्या शाळांना विनाअनुदान तत्वावर [ कालांतराने अनुदान तत्वावर येणा-या परवानगी देण्यात आली आहे. अशा शाळांना मंजूर करण्यात येणा-या अतिरिक्त वर्ग/तुकडयांना शासन निर्णय क्र. व्हीएलएस १०००/[२४५५]/प्राशि-१ दि. ८. ११. ०० मध्ये नमूद केलेले अनुदान सूत्र लागू होईल. त्यामुळे भाविष्यात सन जून २००४, पासून अनुदानास पात्र ठरणा-या तुकडयांना/वर्गांना आवश्यक असणारी आर्थिक तरतुदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावर्षी करुन अनुदान उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आपली राहील. याची नोंद घ्यावी.

२] इंग्रजी माध्यमाच्या व इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या " कायम विना अनुदानित " तत्वावरील प्राथमिक शाळांच्या अतिरिक्त वर्ग/तुकडयांना परवानगी देतांना संबंधितांकडून सदर मंजूर केलेली वर्ग/तुकडी कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर चालविणेबाबत आवश्यक ते प्रतिज्ञापत्र घेऊनच परवानगी देण्यात यावी.

[ क्र. मा. प..

३] ज्या शाळांना जून २००० पासून मान्यता दिल्यानंतर अतिरिक्त वर्ग/ तुकडी अद्यापही अशी तुकडी सुरु केली नसेल तर त्या वर्षापुरती सदर तुकडी ग्राहय धरण्यात येवू नये. व सदर शाळेस तसे आदेश निर्गमित न करता अशा प्रकारे अग्राहय ठरलेली परंतु प्रत्यक्षात मान्य असलेली तुकडी पुनर्जिवित करण्याकरिता संबंधित शाळेचा प्रस्ताव इकडील कार्यालयाकडे पाठवावे. म्हणजे शिफारशीसह पुढे सादर करण्यात येईल.

४] प्रत्येक शाळेस वर्ग/तुकडी मंजुरीचे आदेश करतांना प्रत्येक आदेशात खाली नमूद केलेल्या अटीव शर्तीची शाळा पुर्तता करेल व त्यांच्या अधिन राहून सदर वर्ग अथवा तुकडी मंजूर करण्यात येत आहे.

अ] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेच्या आवश्यक सक्षम अर्ह कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा-शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

ब] सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक,शैक्षणिक व व्यवस्थापन विषायक सुविधा उपलब्ध करुन घ्यावयास हव्यात.

क] सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

ड] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

ई] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

ई] सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या शासन निकषाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

फ] तपासणी अंती एक जरी अट नियम बाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

उपरोक्त सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(सही)
प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- १८.

प्रत :- मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे.
माहिती करिता सादर.

Scanned with ACE Scanner

खाजगी अनुदानित/विनाअनुदानित प्राथमिक शाळांना सन २०००-२००१ या वर्षी इयत्ता १ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत.

शासन परिपत्रक क्रमांक : व्हीएलएस-१०००/[७४३/२०००]/प्राशि-३ दिनांक-११.७.२००१ अन्वये मंजूरी प्राप्त महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड अंतर्गत असलेल्या शाळा. जिल्हा पुणे

विभाग : पुणे.

| मनपा पिंपरी-चिंचवड शाळा | माध्यम | शाळेचे क्षेत्र | शासनाने मंजूर केलेली अतिरिक्त तुकडी/नवीन वर्ग. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ली | २री | ३री | ४थी | ५वी | ६वी | ७वी |
| १) प्राथमिक विद्यामंदिर, भोसरी | मराठी | म०न०पा० | दुसरी | दुसरी | दुसरी | दुसरी | — | — | — |

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- १८.

Scanned with ACE Scanner

२४२२८/३०

**कायम विनाअनुदान तत्वावर**

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 7 OCT 2003

प्रति,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड.

विषय : खाजगी कायम अनुदानित प्राथमिक शाळांना सन २००१-०२ यावर्षी इ. १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वर्ग वाढीचे/अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत. . .

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. व्हीएलएस-१००३/(८५६/०३)/प्राशि-३, दिनांक ६ सप्टेंबर, २००३

सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात उपरोक्त विषयाबाबतचे प्राप्त झालेल्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळांना अतिरिक्त/नैसर्गिक वाढीच्या वर्गांना **कायम विनाअनुदान तत्वावर** मंजूरी मिळालेली आहे, त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधिन राहून वर्गांना मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री रंगदास स्वामी शि. वि. मं. चे प्राथ. विद्यामंदिर, भोसरी, पुणे-३९ | मराठी | मनपा | १ ली | तिसरी | जून २००१ |
| | | | | २ री | तिसरी | जून २००२ |
| | | | | ३ री | तिसरी | जून २००३ |

१. अतिरिक्त/नैसर्गिक वाढीच्या वर्गांचे वाटप करतांना शासन निर्णय दिनांक २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या अतिरिक्त नैसर्गिक वाढीच्या वर्गांची गरज आहे. याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यांत याव्यात.

तसेच ज्या अतिरिक्त/नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी दिली आहे, त्या शाळांकडून **कायम विनाअनुदान तत्वावर** तुकडी चालवावयास तयार आहे, असे हमीपत्र घेतल्यानंतरच संबंधित तुकडीस मंजूरी द्यावी.

मळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मुख्याध्यापक,
श्री रंगदास स्वामी शि. वि. मं. चे प्राथ. विद्यामंदिर, भोसरी, पुणे-३९.

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

Scanned with ACE Scanner

**कायम विनाअनुदान तत्वावर तुकडी मान्यता**

जाक्रप्रा./प्राशि-२/खाप्राशा-तुमा/पुवि/०८ ४४८१-८३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 5 MAR 2008

प्रति

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड, पुणे-१९.

विषय : खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-०२, २००२-०३, २००३-०४, २००४-०५ , २००५-०६ व सन २००६-०७ या वर्षी इयत्ता ५ वी प्रथम व इ. १ ली ते ७ वी च्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत.

संदर्भ : १. मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. प्राशातु-१४०७(४१९/०७),प्राशि-३, दि. ५ जानेवारी २००८
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील क्र खाप्राशा/नैसर्गिक वाढ //ड-५१२/९६९, दि. १२.२.२००८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळांना नेसर्गिक वाढीच्या वर्गांना तसेच अतिरिक्त वाढीच्या वर्गांना **कायम विनाअनुदान तत्वावर** मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधीन राहून वर्गांना मंजूरी देण्यांत येत आहे

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | तुकडी | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळाचे प्राथमिक शाळा, भोसरी, पुणे | मराठी | मनपा | ४थी | तिसरी | जून २००४ |

१. नसर्गिक वाढीचे वर्ग / अतिरिक्त तुकड्या शासन निर्णय दि. २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग / तुकड्यांची गरज आहे, याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यात याव्यात.

३. सदरचे प्रथम वर्ग / अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी दिलेली असल्यामुळे सदर शाळांकडून कायम विनाअनुदान तत्वावर वर्ग / तुकडी चालविण्यास तयार आहे व भविष्यात शासनाकडे अनुदानाची मागणी केली जाणार नाही असे हमीपत्र घेण्यात यावे. .

सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत

स्थळप्रतीवर मा.शिऊसं यांची सही असे.

(ना.बा.निकम)
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१. करिता.**

**प्रत माहितीस्तव सादर**
**१.मुख्याध्यापक,** श्री.रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळाचे प्राथमिक शाळा, भोसरी, पुणे
**२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांचेकडे माहितीस्तव सादर.**

C:\DOCUME~1\Joshi\MYDOCU~1\Bkup\dept\Jawar\TK_Ord0506.doc

Scanned with ACE Scanner